महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५९ वे | दिनांक : १९/०२/२०२६ | वार : गुरूवार

## चंद्रपूरचा बदला आम्ही परभणीत घेतला नाही : उद्धव ठाकरे यांना काँग्रेसचा थेट राजकीय इशारा



**मुंबई :** चंद्रपूर महापालिकेतील सत्तास्थापनेच्या घडामोडींवरून काँग्रेसने शिवसेना ठाकरे गटावर अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली आहे. राज्यातील काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी चंद्रपूरमध्ये ठाकरे गटाच्या नगरसेवकांनी भाजपला पाठिंबा दिल्याचा उल्लेख करत, चंद्रपूरचा बदला आम्ही परभणीत घेतला नाही, असे विधान केले. त्यांच्या या वक्तव्याला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना थेट राजकीय इशारा म्हणून पाहिले जात आहे. महापौर निवडणुकीतील निकालानंतर दोन्ही पक्षांतील संबंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना चेन्नीथलांच्या या सूचक भाष्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांनंतर महापौर पदाच्या निवडणुकीत भाजपाने प्रभावी कामगिरी केली. मात्र सर्वाधिक चर्चा चंद्रपूर महापालिकेची झाली. चंद्रपूरमध्ये काँग्रेसचे सर्वाधिक 27 नगरसेवक निवडून आले होते. तरीही सत्तास्थापनेत काँग्रेसला अपयश आले. भाजपाने शिवसेना ठाकरे गटाच्या पाठिंब्याने महापौरपद मिळवत सत्ता स्थापन केली. त्यामुळे काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला. या घडामोडींमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून मित्रपक्षांमधील तणाव उघड झाला आहे.

या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सूचक शब्दांत प्रतिक्रिया दिली. चंद्रपूर महापालिकेतील घडामोडींवर झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. आमच्याकडे २७ नगरसेवकांचे संख्याबळ होते, मात्र बहुमत नव्हते. तरीही आम्ही चांगले यश मिळवले होते. पण शिवसेना (ठाकरे) गटाच्या आठ नगरसेवकांनी भाजपला पाठिंबा दिल्याने आम्हाला महापौर निवडणुकीत अपयश आले, असे त्यांनी स्पष्ट केले. त्याच वेळी चंद्रपूरचा बदला आम्ही परभणीत घेतला नाही, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांना संदेश दिल्याची चर्चा रंगली आहे.

चंद्रपूरमध्ये नेमके काय घडले, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर झाला. ६६ सदस्यीय सभागृहात काँग्रेस २७ जागांसह पहिल्या क्रमांकावर होती. भाजपाने २३ जागा जिंकल्या, तर ठाकरे गटाला सहा जागा मिळाल्या. वंचित बहुजन आघाडी आणि अपक्ष प्रत्येकी दोन जागा, तर शिंदेसेना, बसपा आणि एमआयएम प्रत्येकी एक जागा जिंकून सभागृहात पोहोचले. स्पष्ट बहुमत कोणालाही नसल्याने सत्ता स्थापनेसाठी इतर पक्षांचा पाठिंबा निर्णायक ठरणार हे स्पष्ट झाले होते.

बहुमतासाठी भाजपाला ११ नगरसेवकांची गरज होती, तर काँग्रेसला फक्त सात नगरसेवकांचा पाठिंबा आवश्यक होता. या पार्श्वभूमीवर महापौर आणि उपमहापौर कोण होणार याबाबत तीव्र राजकीय हालचाली सुरू झाल्या. अखेर भाजप आणि ठाकरे गटामध्ये सव्वा-सव्वा वर्ष महापौरपद वाटून घेण्याचा लेखी करार झाल्याची माहिती समोर आली. त्यानुसार भाजपच्या संगीता खांडेकर यांची अवघ्या एका मताने महापौरपदी निवड झाली. तर उपमहापौरपदी ठाकरे गटाचे प्रशांत दानव ईश्वर चिठ्ठीने विजयी झाले.

या निकालामुळे काँग्रेसमध्ये नाराजी पसरली. सर्वाधिक जागा मिळूनही सत्तेपासून दूर राहावे लागल्याने कार्यकर्त्यांमध्ये असंतोष आहे. स्थानिक पातळीवर खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार यांच्या भूमिकेमुळे पराभव ओढवला, अशीही चर्चा सुरू आहे. काँग्रेसच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे संभाव्य मित्रपक्ष दुरावले का, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, परभणीतील परिस्थितीचा उल्लेख करत चेन्नीथला यांनी स्पष्ट केले की, भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी काँग्रेसने तेथे शिवसेना ठाकरे गटाला पाठिंबा दिला. म्हणजेच चंद्रपूरप्रमाणे प्रतिउत्तर देण्याचा मार्ग त्यांनी अवलंबला नाही, असे त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे काँग्रेसकडून संयम दाखवला गेला, असा संदेश त्यांनी दिला आहे. चंद्रपूरमधील या सत्तानाट्यामुळे राज्यातील आघाड्यांच्या समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. मित्रपक्षांतील विश्वासाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महापौर निवडणुकीतील या उलटफेरीने काँग्रेसला धक्का दिला असला, तरी पुढील राजकीय वाटचालीत पक्ष कोणती भूमिका घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## निवडणुकीपुरतेच मौलाना सक्रिय होते का?; आरक्षणावरून इम्तियाज जलील आक्रमक



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील मुस्लिम समुदायाला देण्यात आलेले ५ टक्के 'एसबीसी' (SBC) आरक्षण, त्यासंदर्भातील शासनादेश आणि परिपत्रक रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समाजात संतापाची लाट असतानाच, माजी खासदार आणि एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी समाजातील मौलानांवर अत्यंत बोचरी टीका केली आहे. जे मौलाना केवळ निवडणुका आल्यावर सक्रिय होतात, त्यांनी आता समाजावर आलेल्या संकटाच्या वेळी रस्त्यावर उतरून नेतृत्व करावे, असे थेट आव्हान जलील यांनी दिले आहे.

इम्तियाज जलील यांनी निवडणूक काळात मौलानांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, निवडणुका आल्या की काही लोक अचानक घराबाहेर पडतात आणि अमुक एका व्यक्तीला किंवा पक्षाला मतदान करा, असे सांगु लागतात. तुम्ही काय पाच वर्षातून एकदाच बाहेर येणार का? आता समाजावर आरक्षणाचे संकट आले आहे, आता तुमची भूमिका काय? असा सवाल त्यांनी केला आहे.

बीडमधील एका राजकीय घडामोडीचा दाखला देत इम्तियाज जलील म्हणाले की, बीडमधील सर्व मौलवींनी एकत्रितपणे अजित पवार यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता आणि समाजाकडून मतदान करून घेतले. म्हणून तिथे आमचा पराभव झाला, आता माझी अपेक्षा आहे की, या सर्व मौलाना लोकांनी आरक्षणाच्या लढाईचे नेतृत्व करावे, मी स्वतः त्यांच्या मागे चालायला तयार आहे.

इम्तियाज जलील म्हणाले की, आम्ही पाच वर्षे रस्त्यावर उतरून समाजासाठी आंदोलन करायचे आणि निवडणुका आल्या की हे लोक दुकाने उघडायला येतात. याला मतदान करा, त्याला मतदान करा, हे आता बंद झाले पाहिजेत. आता आरक्षणाची गरज आहे, तेव्हा या लोकांनी पुढे यावे.

इम्तियाज जलील म्हणाले की, केवळ मुस्लिम समाजच नव्हे तर इतर समाजातील गरिबांबद्दलही जलील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ब्राह्मण समाजातही सर्वच श्रीमंत नाहीत. तिथल्याही गरीब मुलांना शिक्षणाची इच्छा आहे पण पैशाअभावी ते मागे पडत आहेत, त्यांनाही आरक्षण किंवा सवलती मिळायला हव्यात. मराठा समाजाच्या आरक्षणाला आमचा आधीपासूनच पाठिंबा आहे. समाजातील जो घटक शिक्षणापासून वंचित आहे, त्यांच्या उत्पन्नाचा स्रोत बघून त्यांना सवलती दिल्या पाहिजेत, जेणेकरून गरीब मुस्लिम तरुण शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

## अजितदादांसोबत १६ मे रोजीचा प्रवास आणि एकत्रीकरणाबाबत चर्चा:खासदार अमोल कोल्हे

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या चर्चांवरून रोहित पवारांनी केलेल्या दाव्यानंतर शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत चर्चा झाल्या होत्या, ही वस्तुस्थिती असल्याचे त्यांनी मान्य करत आपण सुरुवातीपासून या प्रक्रियेत सहभागी होतो, असे सांगितले. चर्चांमध्ये आपण सुरुवातीपासून सक्रिय होतो, असेही त्यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या भवितव्याबाबत राज्याच्या राजकारणात अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार का, विलीनीकरणाची प्रक्रिया कितपत पुढे गेली होती, याबाबत वेगवेगळ्या पातळीवर चर्चा रंगत आहेत. शरद पवार आणि अजित पवार यांच्यात अनेकदा बैठका झाल्याच्या बातम्या समोर आल्या. या बैठकींचे कथित दृश्यफितीही पुढे आल्याचा दावा करण्यात आला. त्याचबरोबर अजित पवार यांनी जयंत पाटलांच्या निवासस्थानी जाऊन सलग बैठका घेतल्याचेही शरद पवार गटातील काही नेत्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर संयुक्तिक राष्ट्रवादी काँग्रेसची शक्यता अधिकच गडद झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. याच संदर्भात आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत महत्त्वपूर्ण दावा केला. दोन्ही गट एकत्र आले असते, तर शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांची संयुक्तिक राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाली असती, अशी माहिती त्यांनी दिली. ही इच्छा अजित पवारांचीच होती, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले. त्यामुळे अमोल कोल्हे हे प्रामाणिकपणे पुढाकार घेत होते, असेही त्यांनी नमूद केले. या संदर्भात अमोल कोल्हे, सुप्रिया सुळे आणि शशिकांत शिंदे यांनीही आपल्याशी चर्चा केल्याचे रोहित पवार म्हणाले. रोहित पवार यांनी पुढे सांगितले की, दोन्ही गटांच्या एकत्रीकरणासाठी जयंत पाटलांच्या घरी १३ बैठका पार पडल्या. इच्छुकांनी घरातील देखरेख कॅमेऱ्यांचे चित्रण तपासावे, असेही त्यांनी आव्हानात्मक शब्दांत म्हटले. या बैठकींबाबत जयंत पाटलांनीही स्पष्टीकरण दिले असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे या चर्चांना केवळ अफवा म्हणता येणार नाही, असा सूर रोहित पवार यांच्या वक्तव्यातून उमटला. या विधानानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत हालचाली पुन्हा चर्चेत आल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६


# जाणता राजा



आमचा रयतेचा राजा कसा होता?
आभाळाएवढा भलाढ्य होता
सह्याद्रीसारखा धाडसी होता
समुद्राच्या गर्त्यासारखा चतुर होता
निसर्गासारखा देखणा होता
माय-मातीच्या काळजाचा होता...
आमचा छत्रपती कसा होता?
सर्व धर्मसमभाव मानणारा होता
परस्त्रियांना,
आया-बहिणींच्या नजरेने पाहणारा होता
माणसांच्या रूपात माणुसपण जपणारा
देवावतार होता...
आमचा जाणता राजा कसा होता?
जनकल्याणाचा श्वास होता
जनतेचा विश्वास होता
भगव्याची आन, बाण, शान होता
महाराष्ट्राचं दैवत होता
स्वराज्याचा तेजस्वी सूर्य होता...
मालोजींचा नातू, शहाजींचा पुत्र,
जिजाऊंचा शिवबा कसा होता?
स्वराज्याच्या मातीत
नात्यांची ओल निर्माण करणारा होता
म्हाताऱ्या आजी-आजोबांचा नातू होता
मायबापाचं लेकरू होता
तरुण-तरुणींचा भाऊ होता
स्वराज्याचा जाणता राजा
आमचा जीव की प्राण होता...

महाराजांना आम्ही पाहिलं नाही; पण या महाराष्ट्राच्या मातीच्या कणाकणातून आम्ही महाराजांना अनुभवतो.महाराजांचे विचार आमच्या पिढ्यांच्या कानावर पडले आणि आम्हाला महाराज सुईच्या टोकाएवढे कळायला लागले.महाराजांचं नाव घेताच सत्ता उलथापालथ होते; तर विचार करा, महाराजांचे विचार आत्मसात झाले तर काय काय होईल! हे आपल्या बुद्धीच्या पलीकडचे आहे. महाराजांचा फक्त एक विचार आपलं जीवनच नाही, तर या जगाचाही कायापालट करू शकतो. एवढी ताकद महाराजांच्या विचारांत आहे. महाराजांचे विचार आपल्या सारख्या सामान्य माणसांना आत्मसात करणे सोपे नाही. तेवढी साधना करण्याची तयारी आपल्या मानवी मनाची असली पाहिजे. लहानपणापासून शिवविचार घराघरांतून आपल्या बालकांवर रुजले पाहिजेत. शिवविचारांची या काळाला अत्यंत गरज आहे. या भ्रष्टाचारी, अविश्वासी, विश्वासघातकी, स्वार्थी, पापी, वासनाधीन, व्यसनाधीन दुनियेला महाराजांच्या आचार-विचारांची सक्त गरज आहे. आपल्या देशाच्या नव्या भविष्यालाही महाराजांच्या विचारांची गरज आहे. गडकिल्ल्यांचे महत्त्व, नात्यांचे महत्त्व, संगोपन, राजनीती, युद्धनीती, अभियंतानिती, आपुलकी, आस्था, ऋणानुबंध, व्यवहारनीती, अर्थव्यवस्थेची नीती, कलागुणांचा सन्मान, समदर्जा भावना, आपली नाती, आपली माती, आपली माणसं जपण्याचे कौशल्य, स्वाभिमान, विश्वास, मान-सन्मान, 'अतिथी देवो भव', उदारता, मनमिळावूपणा असे असंख्य महाराजांचे विचार आत्मसात करण्यासाठी आजच्या आणि येणाऱ्या पिढ्यांना शिवविचारांचे लसीकरण करणे गरजेचे आहे. महाराजांच्या नावाखाली होणारे स्वार्थी राजकारण, जाती-जातीत बिघडणारे वातावरण आणि या वातावरणात भरकटलेले नवतरुण यांना योग्य दिशा दाखवण्यासाठी खरे शिवविचार त्यांच्या कानावर पडणे आवश्यक आहे. देव मानणाऱ्या, देव्हाऱ्यात पूजणाऱ्या, अभिमानाने स्वाभिमान मानणाऱ्या आपल्या राजाला आपणच दारूच्या दुकानांवर, बारवर, मटणाच्या दुकानांवर, धाब्यांवर, भ्रष्टाचारी आणि विश्वासघातकी लोकांच्या कार्यालयांत नेऊन बसवतो आणि त्यांचा अपमान करतो.महाराजांचा फोटो हृदयाशी लावणारे लोक शेताच्या बांधावरून भाऊ-भावाचा, ल्योक-बापाचा मुर्दा पाडतात. प्रेमप्रकरणांत मुलगी बापाचा घात करते. अब्रू-मंदिरं आणि घरांसारखी लुटली जाते. लाचखोरांना बापाच्या वयाच्या माणसांची दया-माया येत नाही. गरीब-दुबळ्या माणसाचे रूप समजत नाही. भर रस्त्यावर मनास येईल तेव्हा किड्या-मुंग्यांसारखी माणसांची मुर्दे पाडणाऱ्या हैवानांना, कायदा विकणाऱ्या आणि विकत घेणाऱ्यांना, पैशाला देव मानणाऱ्यांना, माणुसकीचा लिलाव करणाऱ्यांना, निर्दोषाला गुन्हेगार आणि गुन्हेगाराला निर्दोष ठरवणाऱ्या व्यवस्थेला, जुलमी आणि अत्याचारी गुंडागिरी करणाऱ्या, अक्कल गहाण ठेवणाऱ्या बेअक्कलांना अक्कल शिकवण्यासाठी शिवविचार त्यांच्या डोक्यात रुजवले पाहिजे. शिवविचार त्यांना प्रसादासारखे नव्हे, तर पोटभर जेवणासारखे वाढले पाहिजेत. क्षणाक्षणाला त्यांना शिवविचार आठवले पाहिजेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध एल्गार केला पाहिजे. त्यांना सत्याला न्याय देता आला पाहिजे.माणसाच्या जन्माला येऊन माणूसपण जपणारा माणूस म्हणून जगता आलं पाहिजे अन् शिवविचार हा बदल नक्की घडवून आणून या भारतीय समाजाला शिव विचारांच्या नव्या विचारावर ,शिव संस्कारावर प्रत्येकाच्या मनामनावर बदल घडवून आणेलचं. शिवविचार म्हणजे अमृत आहे. संस्कारांची ओळख आहे. विश्वकल्याणाचे ब्रह्मास्त्र आहे.




**लक्ष्मण वाल्डे —**
**कन्नड छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं-८८८८६०६०६८**


# व्यक्तीमत्व विकासासाठी चांगला श्रोता होणे गरजेचे आहे - डॉ. अतिष मेहेत्रे




**कन्नड :** शिवाजी महाविद्यालय कन्नड आयोजित मौजे दाभाडी येथील राष्ट्रीय सेवा योज ना विभागाच्या विशेष शिबिरांतर्गत सहाव्या दिवशी दुपारच्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तिमत्व विकास" यावर मार्गदर्शन करत असतान त्यांनी सांगितले की, व्यक्तिमत्व विकास ही काळाची गरज आहे,व्यक्तिमत्व विकासामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो ,आयुष्यात येणाऱ्या विविध अडचणीवर तो मात करू शकतो त्यामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन विविध शिबिरामध्ये आवर्जून भाग घ्यावा व स्वतः चा व्यक्तिमत्व विकास कसा वाढेल यावर लक्ष द्या. तत्पूर्वी सकाळच्या सत्रात मौजे दाभाडी गावातस्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छतेची शपथ घेण्यात आली या शपथेसाठी गावातील नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य मुक्तारभाई शहा व ग्रामस्थ हजर होते, त्यानंतर एड्स जनजागृती रॅलीचं आयोजन मौजे दाभाडी या गावांमध्ये आयोजन करण्यात आलं त्यासाठी कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे श्री संजय सोनवणे, रेड रिबीन क्लब चे संचालक डॉ संघई सर उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना एड्स या रोगाबद्दल माहिती दिली व मार्गदर्शन केले, आपल्या अध्यक्षीय समारोपात ग्रंथपाल डॉ.संतोष देशमुख यांनी सांगितले की, व्यक्तिमत्व विकासामध्ये चांगला श्रोता होणे हा एक घटक महत्त्वाचा आहे ज्याला चांगला श्रोता होता येते तो चांगला वक्त होतो असे मत त्यांनी मांडलेयाप्रसंगी एनएसएस विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव डॉ. सीमा काशीद संयोजन समितीचे सदस्य प्रा.प्रगती चव्हाण, उपस्थित होते, कार्यक्रमाचे सुत्र संचलन आणि पाहुण्यांचा परिचय यश पाटील याने केले कार्यक्रमाचे प्रास्तविक रेवती खरे आभार प्रदर्शन सोयम कायस्थ याने केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस विभागाने विशेष प्रयत्न केले.

# पळसफुले

होता आगमन इथे वसंताचे
अब्दागिरी ध्वज उभे पळसफुलांचे

निष्पर्ण रोविले पळसदंड ते
सजले मंडप केशरी फुलांचे

रणरणती उन्हे देती
सुवर्ण झळाळी तया
कोवळ्या सुकुमार त्या
चैत्रपल्लवीच्या स्वागती

हळुवार उमलती पर्णकलिका इथे
अन माळरानी
उभे पुष्पगुच्छ ते

उकळून करिती मुळे
पळस फुलांचे रंग
निसर्ग रंग पंचमीत
मूल मूल होई दंग


**कवी-भगवंत पाळवदे**
अंबाजोगाई



ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६

## भविष्य घडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी बदल स्विकारणे गरजेचे - मुक्तानंद गोस्वामी



**कन्नड (अरुण थोरात) :** आपले उज्वल भविष्य घडविण्यासाठी बदल हा स्विकारावाच लागतो. परिस्थिती चा बावो न करता आपण मार्गक्रमण करीत रहावे. चांगले शिक्षण प्रशिक्षण घेऊण आपण आपल्या आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे असे अवाहन बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय कळंकी ता.कन्नड चे मुख्याध्यापक मुक्तानंद गोस्वामी यांनी केले आहे. ते शाळेतील इयत्ता १० वी च्या विद्यार्थाना निरोप समारंभ कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. शाळेचे शिक्षक श्री नानासाहेब निंभोरे यांनी प्रास्ताविकात परिक्षेचे महत्व व वेळेचे नियोजन समाजावून सांगीतले, कोणत्या ही गैरमार्गाचे अवलंब न करता परिक्षांना सामोरे जात उज्वल भविष्य घडवावे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमा च्या सुरवातीस विद्यार्थी धनश्री थोरात, पल्लवी कदम, संकेत निंबाळकर, राजवीर थोरात, अदिती थोरात, कावेरी निंबाळकर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली. मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थी अगदी गहीवरून आले होते. शिक्षक गणेश दारवंटे यांनी शाळा हे संस्कार व मानवी मुल्यांचा विकास घडवण्याचे केंद्र असून शाळेत नैतिक मुले विकसित केली जातात. विद्यार्थ्यांनी भविष्यात कोणते ही काम व्यवसाय, नोकरी करत असतांना प्रमाणिकपणा जपला पाहिजे. जीवन जगत असतांना आपले माता, पिता, गुरु चे नाव खाली जाईल असे काम करू नये असे प्रतिपादन केले. मुख्याध्यापक मुक्तानंद गोस्वामी यांनी भविष्य घडविण्यासाठी बदल हा स्विकारावा लागतो बदल हा निसर्गाचा नियम आहे मानवी विकास हा गती आणि प्रगती यावरच अवलंबून असते. अभ्यासाबरोबरच शारिरिक सुदृढता ही गरजेची आहे बुद्धिमत्ते बरोबरच संस्कार महत्वाचे आहेत. शिस्त असल्याशिवाय एक सुजान नागरिक निर्माण होणे शक्य नाही. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने एक चांगला नागरिक होण्याचा प्रयत्न करावा. असे अवाहन केले. परिक्षे साठी विद्यार्थांना मनःपुर्वक शुभेच्छा दिल्या कार्यक्रम यशास्वी करण्यासाठी रविंद्र थोरात, संजय वारे, शशीन जाधव यांनी परिश्रम घेतले.

## साधं भोळं गाव

साधं भोळं गाव! आता संकटात !
जन्मून मातीत! मातीमोल !!

रानात राबून! थकलाय बाप !
उन्हाचाच शाप! पदरात!!

कुणब्याचा लेक! उन्हात तळून!
मातीत मळून! उपाशीच !!

आता गावामध्ये! बदललं वारं!
सिमेंटचा थर! मातीवर!!

मातीच्या घराची! झाली माती माती!
चुकली नियती!अंगणाची!!

पायवाटा ओस! गाव शिवाराच्या!
विहिरी मायेच्या! आटलेल्या!!

चुलीच्या बाहेर! जाईना भाकर!
उपाशी ढेकर! रोजचाच!!

रगत न् जीव! पेरून मातीत !
सरली हयात ! फुकटात!!

तुझ्या घामावर! पोसले लांडगे!
बगळे दांडगे! तयामुळे!!

कृषीच्या देशात! बळी वनवासी!
केली कोणी काशी! जगण्याची!!

गावाच्या शाळेचे! तुटलेले फळे!
इंग्रजीचे खळे! वाढलेले!!

गावशिवाराचे! चुकले गणित!
बॅनर वाढले! रंगाचेचं!!

गणित पिकांचे! रोज चुकलेले!
कोंब जगण्याचे ! सुकलेले !!

काळ बदलला! गाव उदासले!
दिल्लीच्या हवेत! गारठले!!

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
**मो.9403384889**

## मुंग्याच मुंग्या

मुंग्याच मुंग्या
जिकडे तिकडे
एका रांगेत
भिंतीवर चढे

चालतांना त्यांची
शिस्त भारी
नियमांचे पालन
करतात सारी

रात्रंदिवस
त्यांनी धावपळ
अंगी आले
कुठून बळ?

साखरेचे कण
नेतात वाहून
रोजच दिवाळी
करतात खाऊन

कष्ट करण्याची
उत्तम कला
त्यांचा आदर्श
घेवू चला



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

# शिवविचार : यशाचा आणि आत्मविश्वासाचा महामंत्र

**छ**त्रपती शिवाजी महाराज हे भारताच्या इतिहासातील एक महान योद्धा आणि कुशल प्रशासक होते. त्यांचा जन्म 19 फेब्रुवारी 1630 रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले हे विजापूरच्या सुलतानाच्या सैन्यात एक प्रमुख सरदार होते, ते एक पराक्रमी योद्धा आणि कुशल प्रशासक होते. त्यांच्या या अनुभवाचा आणि नेतृत्वगुणांचा प्रभाव शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर होता. शिवाजी महाराजांच्या आधी स्वराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न शहाजी राजांनी सुद्धा केला होता. त्यांनी शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी आवश्यक असलेलं धैर्य, नेतृत्व आणि युद्धकौशल्य शिकवलं. शिवाजी महाराजांच्या आई जिजाबाई एक अत्यंत समजूतदार आणि कणखर राजमाता होत्या. त्या स्वतः धैर्यशील आणि शौर्यवान होत्या. त्यांच्या या गुणांचा प्रभाव शिवाजी महाराजांवर पडला, ज्यामुळे ते पराक्रमी योद्धा बनले. जिजाबाई लहानपणापासूनच शिवाजी महाराजांना रामायण, महाभारत आणि इतर धार्मिक ग्रंथांच्या कथांद्वारे धर्म, न्याय, कर्तव्यनिष्ठा, राष्ट्रप्रेम आणि सत्याचे महत्त्व समजावून सांगत. त्या गोष्टी ऐकून छोट्या शिवाजीला स्फुरण चढे आणि आपणही आपल्या देशासाठी काहीतरी केलं पाहिजे असं वाटे. जिजाबाईंच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पाहिले.अवघ्या सोळाव्या वर्षी शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला जिंकून आपल्या पराक्रमाची सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व स्तरावरच्या लोकांना एकत्र आणलं. त्यांनी तरुण लोकांना एकत्र आणून किल्ल्याचे बांधकाम सुरू केले. आपण या सगळ्यांना शिवाजी महाराजाचे मावळे म्हणून ओळखतो. शिवाजी महाराजांचे या मावळ्यांवर खूप प्रेम होतं ते फक्त त्यांचे साथीदार नसून महाराज मावळ्यांना स्वतःच्या कुटुंबाचा भाग समजत असत त्यांच्या आनंदाच्या, दुःखाच्या प्रसंगी महाराज त्यात सामील होत असत. पुढे मावळ्यांच्या सहकार्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली. यानंतर शिवाजी महाराजांनी अनेक गड किल्ले काबीज केले. कधी शक्ती तर कधी युक्ती या तंत्राचा वापर करून शिवाजी महाराजांनी अनेक मुघल राजांचा, सेनापतींचा पराभव केला. अफझलखान वध, शाहिस्तेखानावर हल्ला, आणि सुरतेची लूट असे अनेक पराक्रम शिवाजी महाराजांनी केले. आपला शत्रू हा कुठूनही अगदी समुद्रातूनही आपल्यावर हल्ला करू शकतो हे ओळखून त्यांनी नौदलची स्थापना केली. शिवाजी महाराज अत्यंत हुशार आणि दूरदर्शी राजे होते. फक्त स्वराज्य स्थापन करून उपयोग नाही तर त्याचे रक्षण करणारा, प्रजेची काळजी घेणारा एक राजा असणं सुद्धा महत्त्वाचं आहे असं ओळखून, 1674 मध्ये रायगड किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि ते झाले "छत्रपती शिवाजी महाराज". ***छत्रपती शिवाजी महाराजा कडून तरुणाने काय बोध घ्यावे.*** आजकालच्या लहान मुलांना शिवाजी महाराजांकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत ते आपण पाहूया. ***शौर्य आणि धैर्य :*** स्वराज्याची शपथ महाराजांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी घेतली. अत्यंत बिकट परिस्थितीत त्यांनी धैर्य राखून आपलं सैन्य उभं केलं आणि मुघल राजवटी विरुद्ध न घाबरता उभे राहिले. कुठल्याही संकटाचा सामना हा अत्यंत धीराने आणि न घाबरता केला पाहिजे. ***शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ / गनिमी कावा*** : शिवाजी महाराजांनी पुण्यातील लाल महालात मुक्काम ठोकलेल्या मुघल सेनापती शाहिस्तेखानावर रात्रीच्या वेळी अचानक हल्ला केला. या हल्ल्यात खान जखमी झाला आणि त्याची बोटे कापली गेली. या घटनेतून महाराजांच्या धाडस आणि गनिमी काव्याचे उदाहरण दिसते. जेव्हा आपल्याकडे शारिरीक बल कमी असेंल तर आपण आपल्या बुद्धीचा वापर केला पाहिजे. ***महिलांचा आदर :*** युद्धाच्या वेळी महिला आणि लहान मुलांवर हल्ला करायचा नाही ही महाराजांची सक्त ताकीद होती. ते फक्त राज्यातील किंवा घरातील नव्हे तर शत्रूच्या पक्षातील स्त्रीचा सुद्धा आदर करत असत.

***न्याय आणि समानता :*** शिवाजी महाराजांनी सुरत शहरावर अचानक हल्ला करून तेथील संपत्ती स्वराज्यासाठी मिळवली. या मोहिमेत त्यांनी नागरिकांना त्रास न देता फक्त शत्रूच्या संपत्तीवर कब्जा केला. या घटनेतून त्यांच्या न्यायप्रियतेचे दर्शन घडते. याशिवाय महाराजांनी त्याच्या राज्यातल्या सर्व स्तरातल्या, सर्व जातीच्या लोकांना एकत्र करून स्वराज्य स्थापन केले. महाराज प्रत्येकाला समानतेची वागणूक देत. ***मावळ्यांवरचे प्रेम :*** छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांमधील नाते हे अतूट विश्वास, प्रेम, मैत्रीचे आणि निष्ठेचे होते. महाराज आपल्या मावळ्यांशी समानतेने वागत, त्यांच्या मतांना महत्त्व देत, आणि त्यांच्या कष्टांची कदर करत. महाराजांनी आपल्या नेतृत्वाने मावळ्यांना प्रेरित केले, त्यांना स्वराज्याच्या उद्दिष्टांशी जोडले, आणि त्यांच्या क्षमतांचा पूर्ण वापर करून घेतला. मावळ्यांचं सुद्धा शिवाजी महाराजांवर खूप प्रेम होतं. तानाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, सूर्याजी काकडे, येसाजी कंक, बाजीप्रभू देशपांडे, शिवा काशीद, बहिर्जी नाईक, मुरारजी देशपांडे, कान्होजी आंग्रे, नेताजी पालकर यांच्यापैकी अनेकांनी स्वराज्य स्थापनेसाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. आपण आपल्यासोबत असणाऱ्या आपल्या मित्रांचा किंवा सहकाऱ्यांचा नेहमी आदर केला पाहिजे. ***राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यनिष्ठा :*** महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या कार्यातून मुलांना देशप्रेम आणि कर्तव्यनिष्ठा शिकता येते. ***छत्रपती शिवाजी महाराजांचे गुण मुलांमध्ये कसे रुजवावे.*** शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन आपल्यासाठी प्रेरणा देणारं आहे. त्यांचं देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा, न्याय आणि समानता यासारखे अनेक गुण आपल्याला मुलांपर्यंत कसे पोहचवता येतील हे आपण पाहू या. गोष्टी, ***कथा:*** कुठलीही माहिती ही गोष्टीरूपातून सांगितली तर ती मुलांना लवकर कळते आणि लक्षातही राहते. शिवाजी महाराजांच्या युद्धाच्या, शक्तीच्या युक्तीच्या गोष्टी तुम्ही मुलांना सांगू शकता. ***नाटक, पोवाडा:*** शाळेच्या स्नेहसंमेलनात, सोसायटी मध्ये होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात तुम्ही लहान मुलांना एकत्र आणून शिवाजी महाराजांवर आधारित पोवाडे, नाटकातील प्रसंग सादर करू शकता. याठिकाणी मुलांच्या कला गुणांना तर वाव मिळेल आणि शिवाजी महाराजांविषयी मुलांना जास्तीत जास्त माहिती मिळेल. ***स्पर्धा :*** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शाळेत किंवा सोसायटीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात तुम्ही वेगवेगळ्या चित्रकला, निबंध, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून त्यांचा विषय हा शिवाजी महाराज ठेऊ शकता. त्यानिमित्ताने मुलं महाराजांविषयी ऐकतील, वाचतील त्यांच्या विषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करतील. ***प्रश्नोत्तरे आणि चर्चा:*** शिवाजी महाराजांच्या विषयी प्रश्नोत्तरे आणि वेगवेगळ्या चर्चा आयोजित केल्या जाऊ शकतात. थोड्या मोठ्या वयाची मुलं यात सहभागी होऊन त्याविषयीचा अभ्यास करतील. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जितकं बोलावं लिहावं तितकं कमीच आहे. त्याचे कारण म्हणजे समुद्राची खोली आणि आकाशाची उंची मोजण्याइतके कठीण काम आहे. आपण फक्त त्यांच्याविषयी आदर बाळगून त्यांनी घालून दिलेल्या मूल्यांचं पालन करू शकतो.



**सुयश सुभाष हुलपल्ले**
ता.उमरगा जिल्हा धाराशिव
मो. नं. ८७८८४०९७९५

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६


# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक

भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाही—कुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. "हे राज्य रयतेचे आहे" हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धर्माधारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना "बंडखोर सरदार" म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात "स्वराज्य" हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते.स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),

bagate.rajendra5@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६


## इतिहास नवदृष्टीने मांडणारी राष्ट्रीय परिषद; संभाजीनगरात 'मराठा साम्राज्य' लोककल्याणाचा वारसा उजागर



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, कै. वामनराव पितांबरे महाविद्यालय व जिजामाता कला महिला महाविद्यालय,पडेगाव छ. संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहासकार वा.सी. बेंद्रे इतिहास अकादमीच्या पहिल्या अधिवेशनानिमित्त "मराठा साम्राज्य: लोककल्याणकारी वारसा" या मुख्य विषयावर बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद दि.१४ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली.उद्घाटन सत्रामध्ये मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर हे उद्घाटक तर विंगकमांडर टी. आर. जाधव हे अध्यक्षस्थानी होते.श्री पुरोगामी शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. हरि जमाले यांनी स्वागताध्यक्ष म्हणून स्वागत केले तर अकादमीचे अध्यक्ष डॉ. विलास पाटील यांनी अकादमीची भूमिका विशद केली. त्यांनी मराठा हा शब्द जातीसाठी संकुचित न करता व्यापक व सर्वसमावेशक अर्थाने समजून घ्यावा व मराठ्यांच्या इतिहासासंदर्भात नवसंशोधनाच्या गरजेसाठी अकादमी इतिहासकारांची फळी निर्माण करणार असे जाहीर केले. याप्रसंगी विद्यापीठ प्राधिकरणावरील डॉ.गजानन सानप, अपर्णा पाटील.प्रा गजानन सानप म्हणले की,मराठा ही व्यापक संकल्पना असून विद्यापीठपातळी वर मराठा काळातील किल्ले,गड सहली यासाठी प्रोत्साहन देत असतो. याशिवाय मा रेखाताई खेडेकर माजी आमदार व प्रा.अपर्णा पाटील एम.सी मेंबर डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, प्रा.गीतांजली बोराडे इतिहास विभाग प्रमुख मा.सुजीत पितांबरे,धनंजय पाटील विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ,अरविंद तेलवाडकर,उपप्राचार्य कविता जाधव आदी उपस्थित होते.उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन एड. वैशाली कडू यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र धाये यांनी मानले. प्रा गजानन सानप म्हणले की,मराठा ही व्यापक संकल्पना असून विद्यापीठपातळी वर मराठा काळातील किल्ले,गड सहली यासाठी प्रोत्साहन देत असतो.या सत्रातील मुख्य बीज भाषण प्रतिइतिहासकार इंजि. चंद्रशेखर शिखरे यांनी केले."इतिहास संशोधनात केवळ डॉक्युमेंट कलेक्शन व समर्पित वृत्ती महत्वाची नाही तर ऐतिहासिक पुराव्यांचे सम्यक दृष्टीने विश्लेषण करून इतिहास शोषितांच्या बाजूने उभा करता आला पाहिजे. व्यक्तिमाहात्म्य बाजूला ठेऊन तत्कालीन सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचे व्यापक आकलन करता येणारे साक्षेपी इतिहासकार वा. सी. बेंद्रे इतिहास परिषदेतून निर्माण व्हावेत" अशी अपेक्षा बीजभाषक प्रतिइतिहासकार चंद्रशेखर शिखरे यांनी व्यक्त केली. मराठा साम्राज्य ही एक व्यापक संकल्पना असून सर्वसामान्य कष्टकरी, शोषित व महिला यांना संधी उपलब्ध झाल्याने त्याची वाटचाल लोककल्याणकारी राज्याच्या दिशेने झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पारंपरिक इतिहास लेखनाची विधायक चिकित्सा करणे आवश्यक असून यातून दुर्लक्षित झालेल्या घटकांचे ऐतिहासिक योगदान स्पष्ट केल्यास त्याचा वर्तमानाशी सुसंवाद होऊन नवइतिहास निर्मितीस मदत होते याचे भान इतिहास संशोधकांना असले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.मराठा सेवा संघातील 'मराठा' हा शब्द व्यापक भौगोलिक व सांस्कृतिक अर्थाने वापरला असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात अन्यायाविरुद्ध लढला त्या सर्व जाती-धर्मातील व्यक्ती या व्यापक अर्थाने मराठा होत्या. भारताला स्वातंत्र्याची अस्मिता देण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले असून या क्षेत्रात अजून बरेच काम करण्याची संधी आहे. युवा इतिहासकारांनी आपल्या योगदानाने हा इतिहास अधिकाधिक समृद्ध करण्यास मदत करावी असे आव्हान उद्घाटक मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांनी केले. दुपारच्या सत्रामध्ये"मराठ्यांचा इतिहास: संशोधनाच्या संभाव्य संधी व दिशा" या विषयावर आयोजित परिसंवादात व्याख्याते प्रा. डॉ. सतीश कदम यांनी पुराव्यांशिवाय इतिहास निर्माण होऊ शकत नाही तो शोधण्यासाठी व त्याचा योग्य तो अर्थ लावण्यासाठी संशोधनातील शिस्त आवश्यक असून त्यासाठी मेहनत करण्याची तयारी व चिकाटी हे गुण संशोधकात असले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे पुराव्यांशी दाखले देऊन इतिहास संशोधन कसे करावे हे त्यांनी स्पष्ट केले. यानंतर पुरातत्व शास्त्र व नाण्यांचे अभ्यासक प्रा. आशुतोष पाटील यांनी शिवराज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या शिवराय व होऊन या नाण्यांचे महत्त्व त्याचे स्वराज्याच्या अर्थशास्त्रातील योगदान व १७२० पर्यंत त्याचे असलेले मूल्यात्मक महत्त्व यावर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकला. पुरातत्त्व शास्त्राच्या संशोधनात असलेल्या संधी त्यांनी या निमित्ताने स्पष्ट केल्या. यानंतर प्रा. डॉ. लिलाधर पाटील यांनी पारंपारिक इतिहास लेखन हे वसाहतवादी चौकटीत अटकलेले असून ज्या सामाजिक आर्थिक जटिलतेने हा इतिहास शक्य केला त्या पार्श्वभूमीचे व शोषित अंकित घटकांच्या कर्तेपणाचे चित्रण इतिहासात होणे आवश्यक आहे असे सांगून मराठा साम्राज्य ही लष्करी ताकद नव्हती तर सामाजिक गतिशीलतेला प्रोत्साहन देऊन त्यांची क्षमता वृद्धी करणारी सर्वसामावेशक लोककल्याणकारी व्यवस्था होती असे प्रतिपादन केले. या परिसंवाद सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे यांनी मराठा साम्राज्याच्या इतिहासात संशोधनात अनेक संधी उपलब्ध असून महाराजांचे कृषी धोरण सागरी आरमाराची रचना त्यांची अर्थव्यवस्था बाजारपेठ महाराजांचे महिला विषयक धोरण मानवी व्यवस्थापन यासारख्या अनेक विषयांमध्ये संशोधनास वाव असून महाराजांचे वैभव असलेल्या प्रत्येक किल्ल्यावर एक संशोधन प्रबंध निर्माण होऊ शकतो त्यासाठी आवश्यक साधने अलीकडे उपलब्ध असून त्या ठिकाणी जाऊन मेहनत करण्याची तयारी संशोधकांची असली पाहिजे यातूनच दर्जेदार संशोधन आकारास येईल असे प्रतिपादन केले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. केतन डेकाटे यांनी केले.द्वितीय सत्रामध्ये निवडक शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले.खुली चर्चा करण्यात आली. या राष्ट्रीय परिसंवादासाठी सुमारे ३०० संशोधक प्रतिनिधी उपस्थित होते तसेच राज्यभरातून १५० च्या वर विषयाशी संबंधित शोधनिबंध प्राप्त झाले होते. या शोधनिबंधांच्या जर्नलचे तीन खंडांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते उद्घाटकीय सत्रात करण्यात आले. तसेच उत्कृष्ट शोधनिबंधांसाठी म. ज्योतिराव फुले सन्मान डॉ अरविंद सोनटक्के,नांदेड(प्राध्यापक गट), प्राच्यविद्यापंडित कॉम्रेड शरद पाटील सन्मान प्रा माधुरी वाघमारे, छ. संभाजीनगर(संशोधक विद्यार्थी) व स्मृतीशेष प्रा. मा.म.देशमुख सन्मान(UG/PG विद्यार्थी)गणेश पाडवी व संजय फडतरे नंदुरबार यांना सन्मानित करण्यात आले. व त्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.समारोपीय सत्राच्या अध्यक्षस्थानी आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, बीड अध्यक्ष इंजि. किशोरनाना हंबर्डे, अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले की असत्य इतिहासाला सेन्सॉर करायला हवा. प्रमुख पाहुणे मा.प्रशांत अमृतकर, कुलसचिव, मा.प्रा.व्यंकटेश लांब, मा. प्राचार्य, जी.बी.पाटील, मा.अरविंद तेलवाडकर, प्रा.डॉ.सर्जेराव जिगे, डॉ.योगीता होके पाटील, जिजाऊ ब्रिगेडच्या वैशालीताई कडू, इंजि. डी.एम. पाटील, जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ,सत्यभामाताई पाटील यांची आदि मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन अकादमीचे सचिव डॉ.राहुल पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष डॉ.हरी जमाले यांनी केले. या राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## मोफत प्रशिक्षण योजनाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत 'सृष्टी सोशल वेल्फेअर सोसायटी छत्रपती संभाजीनगर' सामाजिक संस्थेच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कौशल्य आधारित शिक्षण देण्याचे हेतूने शिवजयंतीच्या निमित्ताने १९ फेब्रुवारी २०२६ पासून विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे. Tally/ Account Executive ( Prime with GST ) या कोर्ससाठी जास्तीत जास्त वीस विद्यार्थ्यांची विशेष प्रशिक्षण वर्ग राबवण्यात येणार आहे. या कोर्स साठी दोन महिने प्रशिक्षक म्हणून तज्ञ मार्गदर्शक लागणार आहे.तरी खाजगी क्षेत्रात नोकरी करू इच्छिणाऱ्या २०ते ३० वयोगटातील बेरोजगार गरीब होतकरू विद्यार्थ्यांनी हा कोर्स केल्यास त्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त या योजनेचा लाभ घ्यावा. असे सृष्टी सोशल वेल्फेअर सोसायटीच्या सचिव माया वाघ यांनी कळविले आहे. इच्छुकांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ही नम्र विनंती. ८८०५९८२७२०/ ९२२६९५७७२६

## रमजान महिना...!

बरकतीचा महिना
रमजान आला आहे,
इबादत करण्याचा
उत्साह वाढला आहे.

पाच वेळेची नमाज
रोज पढण्यात येई,
पहाटे सेहरी आणि
सूर्यास्त इफ्तार होई.

उपवास ठेवणारे
सारे आनंदीत दिसे,
सगळ्या रोझेदारांच्या
चेहरा प्रसन्न दिसे.

दिवसभर कुराण
वाचण्यात वेळ जाई,
रात्री, ईशा- तराबीची
पवित्र नमाज होई.

लहाण मुले-मुली
पहिला उपास धरतात,
मौलाना दुव्वा पढून
त्यांचा रोजा सोडतात.

**- अय्युब पठाण लोहगांवकर,**
ता. पैठण. मो. 9764350374

## वसंत

लवकरच होईल आता
गारव्याची ही सांगता

अन् लबकरच दिसेल
पारा उष्णतेचा चढता

लागले आहेत डोहाळे
अन् वसंतांची चाहूल

चैत्र पल्लवीचेही पहा
पडतेय हळुवार पाऊल

फुलोरायचाच मोसम
पाखरांची हो घालमेल

आनंद गाणी गात गात
दिन कोकळचेअलबेल

**कवी - भगवंत पाळवदे**
अंबाजोगाई


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६

## आलूर-बोळेगाव रस्ता काम मार्गी; डॉ. रामलिंग पुराणेंच्या पाठपुराव्याला यश



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब मुरूम मोड ते मुरूम -आलूर -बोळेगाव मार्गे अक्कलकोटला जोडणारा रस्ता काम घिसाड घाईने उरकण्यात आले त्यामुळे रस्त्यावर ठिठिकाणी खड्डे पडले आहेत त्याचबरोबर आलूर - बोळेगाव रस्ता काम अद्याप प्रलंबित असल्याने वाहतुकीस, नागीरकांना त्रासाना सामोरे जावे लागत आहे, याबाबत समाजसेवक तथा बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी १४ सप्टेंबर रोजी सदरील प्रलंबित रस्त्यावरील पाणी साचलेल्या खड्ड्यात बसून लाक्षणिक आंदोलन करीत संबंधित विभागाला रस्ता काम तात्काळ पूर्ण करावी अशा मागणीचे पत्र दि. १८. ०९. २०२५ व दि. ०६ ऑक्टोबर रोजी ईमेलच्या माध्यमातून केली होती अन्यथा दि. १४ ऑक्टोबर पासून आमरण उपोषण आंदोलन छेडण्याचा ईशारा पत्रात दिला होता. संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन दि. १३ ऑक्टोबर रोजी मुरूम पोलीस स्टेशन येथे सहायक पोलीस निरीक्षक संदीप दहिफळे, राष्ट्रीय महामार्ग विभाग अधिकारी, शेतकरी, बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांच्यात बैठक संपन्न झाली आणि सदरील १३०० मीटर रस्त्यावर तूर्तास दुरुस्ती करण्यास शेतकऱ्यांनी समत्ती दर्शवली त्यामुळे आणि संबंधित विभागाच्या लेखी आश्वासना नंतर १४ ऑक्टोबर रोजीचा आंदोलन स्थगित करण्यात आला होता. त्यानंतर संबंधित विभागाने तात्काळ मुरूम मोड ते बोळेगाव रस्त्यावरील ठिक ठिकाणचे खड्डे दुरुस्ती काम आणि प्रलंबित रस्त्यावर मुरूम टाकून दुरुस्ती करण्यात आले. मात्र डांबारीकरण काम अद्याप प्रलंबित आहे, सदरील विषयावर डॉ. पुराणे यांचा कायम पाठपुरावा चालू होता पुन्हा ११ जानेवारी २०२६ रोजी पत्र पाठवून प्रलंबित आलूर - बोळेगाव रस्ता (१३००) रस्ता काम पूर्ण करण्यास विनंती केली होती, मात्र शेतकऱ्यांची अधिक जमीन अधिग्रहण म्हणजे भूसंपादन रक्कम मंजुरी मिळाले नसल्याने सदरील रस्ता काम अद्याप प्रलंबित आहे. दि. १८. ०२. २०२६ रोजी संबंधित विभागानी पत्र पाठवून सदरील रस्ता कामासाठी भूसंपादन ची मंजुरी भूतल परिवहन मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून प्राप्त झाली असून सदरच्या मंजुरी अन्वये भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून आलूर बोळेगाव रस्त्याचे (१३००मी ) रस्ता काम हाती घेऊन पूर्ण करण्यात येणार असल्याबाबत पत्राद्वारे डॉ. रामलिंग पुराणे यांना कळवीण्यात आले आहे.

## पुस्तक परीक्षण "रानवा" (काव्यसंग्रह)




प्रा. सखाराम डाखोरे हे परभणी जिल्ह्यातील जितूर तालुक्यातील केहाळ या गावचे असून, आंध या आदिवासी जमातीतून, कष्टकरी कुटुंबातून आलेले कवी असून,कोरडवाहू चार एकर जमीन, ती नापीक डोंगराळ भागातली, वर्षानुवर्षे सावकाराकडे गहाण पडलेली, आई-वडील पोटापाण्यासाठी रोजगार शोधत बाहेर पडलेले, याच्या त्याच्या जवळ राहत ,गुरं राखत शाळा शिकणारा सखाराम अतिशय हालाखीच्या परिस्थितीतून हिमतीने, स्वतःला टिकून ठेवतो. संघर्ष करत उच्चविद्याभूषित होतो. दरम्यान आईच छत्र हरवलं. तरी शाळा सोडली नाही इथं तिथं मजुरी करत विना अनुदानित शाळेवर शिपाई, ट्रकवर क्लीनर , पुढे ड्रायव्हरकी करत एम ए, बीएड पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. जालन्याच्या जेइएस महाविद्यालयात अर्धवेळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली, कुणीच आपलं नाही अशा आभाळ कोसळत, नेट परीक्षा पास होतो,तो मात्र सगळ्यांना आपलंस करत जातो, एक दिवस परिस्थितीवर मात करत पूर्णवेळ अनुदानित महाविद्यालयात प्राध्यापक कोणाचे स्वप्न साकार करतो. आज उच्चविद्याभूषित ठाणे जिल्ह्यातील वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयामध्ये मराठी साहित्याचा प्राध्यापक होतो आणि मुंबईसारख्या महानगरीत आयुष्य स्थिर करतो तरीही त्यांने आपल्या गावाकडची नाड तोडली नाही, आई-वडील भाऊ भावंडांनाही महानगरात घेऊन स्थिर होतो. त्याचा यशा शिखराकडे नेणारा हा संघर्ष त्यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहातून म्हणजेच "रानवा "यामधून दिसतो. सखाराम डाखोरे यांना त्यांच्या कवितेच्या छंदाने बळ दिलेले आहे . कवितेने ओळख मिळवून दिली.

त्यांच्या रानवा या काव्यसंग्रहाला महाराष्ट्रातील नामवंत कवी इंद्रजीत भालेराव यांनी प्रस्तावना लिहिली असून निर्मळ मनाचा कवी असा ते उल्लेख करतात. कवीचं मातीशी कसं नातं असतं हे रानवा काव्यसंग्रहतून दिसते. "माय बाप माझे माझे इळा, कोयत्याची धार शेतामध्ये राबती ,कष्टती अपार ...." या काव्यपंक्तीतून शेतीमातीशी असलेलं त्यांचं घट्ट नातं दिसतं, रान, ती कोण होती, नसीब, लाज झाकणारे झाड, रीन, भाकर ,वनवा, जागर पाण्यासाठी, भुकेने जाग आली, गावची वाट, वादळ, भटकंती. या कविता मधून ग्रामीण जीवनातील, दुःख वेदना दिसतात. तू ग रूपाचं चांदणं, सये तू या कविता रोमांटिक असून ग्रामीण जीवनातील प्रेम फुलवतात. पाहुणा, तुझे व्याकुळलेले डोळे, ओढ या ग्रामीण कवितेमधून जीवनाची आस दिसते.

रानवा या कवितेतून "आदिम युगांच्या रानव्यात, लखख उजळून निघताना, यातनाचा डोंगर हालू लागतो ,वेदनाचे पहाड बोलू लागतात, भावनांच्या नदया भाऊ वाहू लागतात, पुरोगामित्वाकडे.... या कवितेतून निसर्ग व गावावरील कवीचं प्रेम दिसतं.

कष्टकरी माय~बापास हा पहिला कवितासंग्रह कवी सखाराम डाखोरे यांनी समर्पित केलेला आहे.काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ देखणं असून, नवघर वसई येथील डिंपल पब्लिकेशन ने प्रकाशित केला असून, कवितासंग्रहाचे मूल्य~150/~ आहे.

**पुस्तक परिचय.**
**" रानवा" (काव्यसंग्रह)**
**कवी~सखाराम डाखोरे.**
***समीक्षक~प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, जालना.**

## रहाळपट्टी तांडा जिल्हा परीषेदच्या शाळेत स्वच्छता जनजागृती



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** : छत्रपती संभाजीनगर जवळील जटवाडा केंद्रा अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रहाळपट्टी तांडा या शाळेवर नुकतेच स्वच्छता पंधरवाडा अभियान या स्वच्छतेविषयी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून लोहगाव ता.पैठण येथील साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांनी विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना सांगितले की," जिथे नाही शुद्ध मन, तिथे काय करीन साबन ? " तसेच " प्रत्येक विद्यार्थी यांनी शाळेचा परिसर, आपापला वर्गाची स्वच्छता केली पाहिजे.नेहमी परिसर स्वच्छ राहील्याने प्रकृतीही चांगली राहते आणि स्वच्छ ठिकाणी अभ्यासात विद्यार्थी रमतो. " याप्रसंगी कवी अय्युब पठाण यांनी स्वच्छता अभियानावर एक सुंदर कविता तयार करून आपल्या मधूर आवाजात सादर केली. आणि उपस्थितीत शिक्षक - विद्यार्थी यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक किरण आंबेकर हे होते. तसेच शिक्षक तथा कवी मनोज खुटे यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन करून कार्यक्रमात रंगत आणली. या प्रसंगी शिक्षक अनिल दाणी आणि विद्यार्थी हे मोठया संख्येने उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १९ फेब्रुवारी २०२६


## सलग चौथ्या वर्षी शिवजयंती साजरी करण्यासाठी हजारो शिवप्रेमी आग्रा येथे रवाना



**दौलताबाद (प्रा. शिवाजी गायकवाड) :** अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान छत्रपती संभाजी नगर'च्या पुढाकाराणे विनोद पाटील यांच्या पुढाकाराने होत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती याहिवर्षी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आग्रा येथील ऐतिहासिक किल्ल्यात हा भव्य सोहळा संपन्न होणार असून, कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती उत्सव साजरा होत आहे.शिवप्रेमीची सुरक्षा,,येण्या जाण्यासाठी, जेवण, पाणी नाश्ता, प्रवासाची मोफत व्यवस्था करण्यात आलेली आहे.सरपंच संजय कांजूने, अतिक मोतीवाला,अशोक मोरे, उद्धव पवार, रेखा वाहटूळे, तनुश्री गायकवाड, अमोल कर्डीले, भारत भुमें, अण्णा जाधव, प्रा. शिवाजी गायकवाड, विशाल जाधव, उद्धव पवार, राजेंद्र पाटील, किशोर पाटील, भरत पवार, अतिष वाघमारे, अक्षय गायकवाड आदिसह शिवप्रेमी नागरिक यांची मोठया संख्येने रेल्वे्ने रवाना झाले.

## समायोजन वेळापत्रकाची मराठवाडा शिक्षक संघाने केली होळी !

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षक संघाने शासनाच्या संचमान्यता निकष व समायोजन वेळापत्रकाविरुद्ध आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाचा मुख्य उद्देश एस एस सी व एच एस सी बोर्ड परीक्षेच्या काळात नियोजित समायोजन प्रक्रिया तारखा बदलण्यात याव्यात आणि 15 मार्च 2024 च्या शासन निर्णयातील 9वी व 10वी च्या किमान संख्येच्या अटींमुळे राज्यातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात फुगलेली आहे, त्यात संशोधन करून सुधारित निकष तयार करण्यात आले पाहिजे हा आहे. तसेच एच एस एस सी बोर्ड परीक्षेत मराठवाड्यातील काही जिल्ह्यात शिक्षकांवर सरसकट गुन्हे दाखल होत आहेत त्याची संपूर्ण चौकशी शिवाय सरसकट गुन्हे दाखल करू नयेत ही बाब अन्यायकारक व कायदेशीर नाही याची दखल घेत निर्दोष शिक्षकांवर होत असलेले गुन्हे तत्काळ मागे घ्यावे या प्रमुख मागणीसाठी मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. 18 फेब्रुवारी 2026 रोजी विभागीय उपसंचालक कार्यालय, भडकल गेट, छत्रपती संभाजीनगर येथे हे आंदोलन करण्यात आले. या वेळी केंद्रीय कार्यकारिणीचे सहसचिव राजकुमार कदम, केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे महानगर सचिव नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, रावसाहेब बोरसे, विनोद केनेकर, विलास चव्हाण, कृष्णा गोंडे, रवींद्र मगर, रामेश्वर गोराडे, संभाजी जाधव, सचिन मुसळे, सागर सुर्यवंशी, तुकाराम भवर, धनंजय भवर, अजित जाधव, विवेक पाटील, जितेंद्र शिंदे, पद्माकर पगार, संतोष सुरडकर, अरूणा चौधरी, सविता हिंगे, सोनाली गव्हाणे, स्वाती बोंडे, रेखा साकळे यांच्यासह अनेक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होत.समायोजनाची नियोजन प्रक्रिया 13 फेब्रुवारी 2026 ते 31 मार्च 2026 या कालावधीत आयोजित करण्यात येऊ नये या कालावधीत इयत्ता 10 वी व 12 वी परीक्षा सुरू आहे. सर्व शिक्षण क्षेत्रातील कर्मचारी परीक्षेच्या कामात व्यस्त आहेत, म्हणून आपण ही समायोजन प्रक्रिया परीक्षा संपल्यानंतरच घ्यावी. तसेच 10वी व 12वी परीक्षेत शिक्षकांवर सरसकट गुन्हे दाखल होत आहेत त्याची संपूर्ण चौकशी शिवाय सरसकट गुन्हे दाखल करणे अन्यायकारक व कायदेशीर नाही याची दखल घेत हा निर्दोष शिक्षकांवरील होत असलेला अन्याय तत्काळ थांबवावा अन्यथा मराठवाडा शिक्षक संघाने शासनाला ठणकावून इशाराच दिलेला आहे की येणाऱ्या काळात संपूर्ण मराठवाड्यात उग्र स्वरूपाचे धरणे आंदोलन करण्यात येतील.





